RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ७९] मंगळवार, ऑक्टोबर १, २०१३/आश्विन ९, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १३२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर २०१३

### अधिसूचना

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक. २०१२/६९२/प्र.क्र. २३७/म-१.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा अधिनियम क्र. ६०) (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त आदेश असा करण्यात येईल) मधील कलम ६९ च्या पोट-कलम (२) च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या अन्य अधिकारांचा वापर करून, शासन याद्वारे मुंबई मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चिती) नियम, १९९५ ला सुधारणा करून खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमास मुंबई मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चिती) (सुधारणा) नियम, २०१३ असे संबोधण्यात येईल.

२. मुंबई मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चिती) नियम, १९९५ मधील नियम ४ मधील खंड ६ मध्ये,—

(१) पहिल्या परंतुकानंतर खालील परंतुक ज्यादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, जर मालमत्ता शासनाकडून, निमशासकीय मंडळाकडून किंवा शासकीय उपक्रमाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून खरेदी किंवा संपादित किंवा ताब्यात घेतली असेल तर विलेखात नमूद केल्याप्रमाणे उक्त संस्थांकडून प्रतिलाभार्थ/मोबदला म्हणून निर्धारित केलेले मूल्य हे विषयवस्तू असलेल्या मालमत्तेचे वास्तविक बाजारमूल्य असेल.";

(२) विद्यमान दुसऱ्या परंतुकात "आणखी असे की" या शब्दाऐवजी "परंतु तसेच" हे शब्द अंतर्भूत करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश नार्वेकर,**
शासनाचे उप सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 30th September 2013

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank. 2012/692/C.R. 237/M-1.—In exercise of the powers conferred by clause (2) of sub-section (*1*) of section 69 of the Maharashtra Stamp Act (Act No. LX of 1958), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Stamp (Determination of Truc Market Value of Property) Rules, 1995, as follows namely :—

**1.** These rules may be called the Bombay Stamp (Determination of True Market Value of Property) (Amendment) Rules, 2013.

**2.** In rule 4 of the Bombay Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995, in clause (6),—

(*i*) after the first proviso, the following proviso shall be inserted, namely :—

" Provided further that, where the property is purchased or acquired or taken over by the Government, Semi-Government Body or a Government Undertaking or Local Authority, then the actual value determined as consideration by the said bodies as mentioned in the deed, shall be considered to be the true market value of the subject matter property.";

(*ii*) in the existing second proviso, for the words "Provided further that" the "Provided also that," shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH NARVEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.